**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर – ४१६ ००४**

**परिपत्रक क्र. कोविमं/शाखा माध्यमिक परीक्षा/2093/दिनांक : ०५.११.२०१८**

**विषय : मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत .. ..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मार्च **२०१९** मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATA BASE वरुन शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. १५/१०/२०१८ ते ०५/११/२०१८ या कालावधीत भरावयाची होती. परंतु SARAL DATA BASE ने माहिती भरताना काही शाळांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देणेत येत असन सदर मुदतवाढीच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahasscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सरळ डाटाबेस वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदत वाढीच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा. |
|---|---|---|
| नियमित शुल्कासह | मंगळवार दि. ०६/११/२०१८<br>ते<br>शुक्रवार दि. १६/११/२०१८ | सोमवार दि. २६ /११/२०१८<br>ते<br>शनिवार दि.०१/१२/२०१८ |

अ) माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख - बुधवार दि.०५/१२/२०१८ अशी आहे.

ब) दि .२६/११/२०१८ ते ०१/१२/२०१८ या कालावधीत माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांच्या याद्या EXCEL मध्ये प्रिंटींग करणे.

आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावीत. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१) शासन आदेशानुसार माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी व SARAL DATA BASE मध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे व SARAL DATA BASE वरुनच नियमित विद्यार्थ्यांची भरावयाची आहेत.

२) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे व SARAL DATA BASE वरुन SAVE होत नसल्यास त्यांनी दि.०६/११/२०१८ पासून उपरोक्त दिलेल्या मुदतीत ALL APPLICATION च्या LINK वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

३) उर्वरीत इतर विद्यार्थ्यांच्या नियमित व विलंब शुल्काच्या यापूर्वी कळविलेल्या तारखांमध्ये व तपशिलामध्ये कोणताही बदल कलेला नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

४) सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५) नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.